**उपविभागीय अधिकारी,तथा भुसंपादन अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालय**
फोन नं.०७२२३-२२७२०० फॅक्स क्र.०७२२३-२२७३११ ई-मेल sdo.achalpur@gmail.com

---

क्र/अका/भू.सं./कावी- 9638 /२०१७ दिनांक :- 10 /०८/२०१७

---

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत**

# -: जाहीर नोटीस :-

**वाचा :-** म.शा.महसुल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २५/०१/२०१७

भु.सं.प्र.क्र.०१/४७/२०१७-१८ मौजा असदपूर
ता.अचलपूर जि.अमरावती

ज्याअर्थी **विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर** तर्फे **कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती** यांनी **चंद्रभागा बॅरेज बृहत लघु प्रकल्पाच्या करीता** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५ /प्र.क्र.३४/अ-२/ दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने **वि.पा.वि.महामंडळ, नागपूर** तर्फे **कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती** यांचे नांवे घेण्याबाबत त्यांचे **पत्र क्र.८१५/२०१७ दिनांक १८/०३/२०१७ भुसंपादन प्रस्ताव क्र.०१/४७/२०१७-१८ मौजा असदपुर एकूण क्षेत्रफळ १.४१ हे.आर** प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे **आदेश क्र.२९६/२०१७ दिनांक २४/०३/२०१७** अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ आणि तद्नुषंगीक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र.एलक्युएन-०१/२०१७ प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी **डॉ.व्ही.के.राठोड, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर** याव्दारे -

**अनुसूची (एक)**

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर तर्फे कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि

**अनुसूची (दोन)**

प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरीय समिती मार्फत भुसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकुण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

## अनुसूची (तिन)

संबधीत भुधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर तर्फे कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग,अमरावती यांचे नांवे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णत व अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधीत भुधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३) संमती पत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अभियंता, अमरावती पाटबंधारे उपविभाग क्र.५ दर्यापूर यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/ उपविभागीय अभियंता,अमरावती पाटबंधारे उपविभाग क्र.५ दर्यापूर (अमरावती) यांचेमार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखडयाची प्रत उपविभागीय अभियंता पाटबंधारे उपविभाग, क्र.५ दर्यापूर (अमरावती) यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भुधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तीना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (एक)

**भुसंपादन प्रकरण क्रमांक ०१/४७/२०१७-१८ मौजा असदपूर ता.अचलपूर जि.अमरावती**

प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ठ (खरेदी घ्यावयाच्या) जमीनीचा तपशिल

| अ.क्र. | भुधारकांचे नाव | राहणार | गट सर्व्हे क्रमांक | भुधारणा प्रकार | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री दिपक उत्तमराव काळे | असदपूर | ४६१ | भो.वर्ग-१ | ०.९१ | ०.६० |
| २ | श्री ओंकोश्वर संस्थान तर्फे गुणवंत रामराव म्हाला | असदपूर | ३७१ | भो.वर्ग-१ | १.२१ | ०.६१ |
| ३ | श्रीमती .चंदाबाई हरीचंद्र तिवलकर<br>रंजना हरीचंद्र तिवलकर<br>सिमा हरीचंद्र तिवलकर<br>मंगेश हरीचंद्र तिवलकर अ.पा.क गं भा चंदा हरीचंद्र तिवलकर | असदपूर | ३७१ | भो.वर्ग-१ | १.६२ | ०.२० |
| | एकूण | | | | ३.७४ | १.४१ |

(डॉ. व्हि.के.राठोड)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
अचलपूर